महाराष्ट्र शासन
कृषि व पदुम विभाग,
५वा मजला, दालन क्र.५१३-A (विस्तार),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.६.२०२५ मधील तरतुदींनुसार खालील विवक्षित सेवा/ कामाकरीता करार पध्दतीने अधिकारी नियुक्त करावयाचे आहेत -

१) **विवक्षित कामाचे स्वरुप, करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्यांचा संवर्ग व संख्या** :-

| अ.क्र. | विवक्षित काम | संवर्गामधून निवृत्त झालेले अधिकारी व वेतनस्तर | करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | कृषि व पदुम विभाग तसेच आयुक्त (कृषि) तथा कृषि संचालनालय स्तरावर निर्गमित करण्यात आलेले विविध परिपत्रक, मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय, अधिसूचना इत्यादी बाबींचे संकलन करुन सर्व सूचनांचे अद्यावतीकरण करणे तसेच अद्यावत माहिती संकेतस्थळावर/ पोर्टलवर upload करणे, डिजिटायजेशन करणे, कृत्रिम बुध्दिमत्ता आधारित महाविस्तार ह्या पोर्टलमध्ये सदर माहिती योग्यरित्या समाविष्ट करण्यासाठी मदत करणे, वरील सर्व माहितची उपयोगिता तपासणे, शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना अथवा घटक व त्याकरिता अस्तित्वात असलेले मार्गदर्शक सूचना यांचे संकलन व त्यामध्ये काळानुरुप बदल करावयाचे असल्यास, त्याबाबत आवश्यक त्या सुधारणा सुचविणे. | मंत्रालयीन सेवेतील अवर सचिव, गट-अ (राजपत्रित) (वेतन स्तर एस-२३, ६७७००-२०८७००) **अथवा** कक्ष अधिकारी, गट-ब (राजपत्रित) (वेतन स्तर एस-१७, ४७६००-१५११००) | ०१ |
| | | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गट-अ (राजपत्रित) (वेतन स्तर एस-२३, ६७७००-२०८७००) **अथवा** कृषि उपसंचालक / उपविभागीय कृषि अधिकारी, गट-अ (राजपत्रित) (एस-२०, ५६१००-१७७५००) | ०१ |
| २. | ई-एचआरएमएस प्रणालीवर नोंदी घेणे, | मंत्रालयीन सेवेतील सहायक / | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | सेवापुस्तकांमधील सर्व नोंदी पूर्ण करणे, कार्यमूल्यमापन अहवाल नोंदी घेणे, ई-सेवापुस्तके तयार करणे. | सहायक कक्ष अधिकारी, गट ब (अराजपत्रित) (वेतन स्तर एस-१४, ३८६००-१२२८००) | |

**<u>ब) वयोमर्यादा व अनुभव –</u>**

१. वय ६५ वर्षांपेक्षा कमी असावे.

२. विवक्षित कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा.

**<u>क) नियुक्तीच्या अटी व शर्ती</u>** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.६.२०२५ अन्वये लागू राहतील.

इच्छुक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह दि.११.७.२०२५ पर्यंत सादर करावेत. जाहिरातीमधील पदांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार विभागाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**ड) पारिश्रमिक** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.६.२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय राहतील.

अवर सचिव

कृषि व पदुम विभाग

email:- desk-est१.agri@mah.gov.in